# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 09/10/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील उमरी नरखेड येथे दिनांक 29/09/2021 चे 20.00 वा. ते दिनांक 30/09/2021 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पांडुरंग गुलाब ठाकरे वय 55 वर्ष, रा. उमरी (वडेगाव)यांची उमरी शिवारात 6 एकर शेती आहे. सन 2019 मध्ये फिर्यादीला शासनाकडुन स्टार्टर चे 16,500/रु भरून सौर उर्जा स्टार्टर मिळालेले होते. ते स्टारर्टर विहीरीत लावलेले होते. त्याचा वापर विहीरीतील पाणी काढण्या साठी होतो. दि 30/9/2021 रोजी सकाळी 10.00 वा दरम्यान फिर्यादी व त्याचा मुलगा कुशल ठाकरे विहीरीजवळ गेले असता त्यांना विहीरीवरील असलेले स्टार्टर शक्ती कंपनीचे किमत 8,000/–रु. दिसला नाही. आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आला नाही अज्ञात आरोपीने किमत 8,000/–रु. स्टार्टर शक्ती कंपनीचे चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री कोल्टे मो क्र 8805448417 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 27 कि.मी. अंतरावरील मौजा पाचगाव शिवार येथे दिनांक 02/10/2021 चे 18.00 वा. ते दिनांक 08/10/2021 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अतुल शेषराव भेंडे वय 45 वर्ष, रा. प्लॉट न. 06 आदर्श नगर उमरेड रोड दिघोरी नागपूर यांच्या बंद दालमिल मध्ये अज्ञात आरोपीने खिडकीच्या मार्गे प्रवेश करून तेथे लागलेल्या मशिनचे 05 एच पी मिटर किमती 15,000/–रू., 03 एच पी. ईलेक्ट्रीक मोटार कि. 10,000/–रू. , 05 एच पी ईलेक्ट्रिक मोटारपंप कि. 15,000/–रू. व 01 एच पी ईलेक्ट्रिक मोटारपंप व लोहा लंगर कि. 6,000/–रू. असा एकुण 46,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 380, 461 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो. नि. श्री चंद्रकांत मदने हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. खापा :– अंतर्गत मौजा खापा येथे दिनांक 08/10/2021 चे 00.30 वा. ते 00.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जानबा तुकाराम सोनकुसरे, वय 81 वर्ष, रा. जुनी वस्ती खापा हे आपल्या घरातील टिणावर चडुन पिंपळाचे झाडाचे पडलेले पाने काढत असतांना आरोपी नामे– लोकेश दयाराम कुभांरे वय 30 वर्ष रा. जुनी वस्ती खापा याने फिर्यादी सोबत भांडन करून गालावर दोन थापड मारल्याने फिर्यादी जमिनीवर पडले व त्यांचे उजव्या हाताच्या खांदयाला हडीला मार लागुन फॅक्चर झाले. तसेच आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास स.फौ विजय बारई मो.न. 9822289572 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर